दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२१ ■ शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -321 ■ Friday, 21 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## पैठण येथे नाथषष्ठी निमित्त जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विधीवत पूजा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नाथषष्ठी निमित्त पैठण येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते सपत्निक विधीवत पूजा करण्यात आली. आ. विलास भुमरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसिलदार दत्ता भारस्कर आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी आलेल्या दिंड्यांमध्ये सहभागी होऊन वारकऱ्यांच्या भेटी घेऊन विचारपूस केली. आज सकाळी सात वाजता ही पूजा करण्यात आली.

नाथषष्ठी यात्रौत्सवासाठी यंदा एकुण ६२७ पायी दिंड्या पैठण व परिसरात दाखल झाल्या आहेत. सुमारे लाखभर वारकरी मुक्कामी आहेत. पैठण नगर परिषदेच्या वतीने या सर्व दिंड्यांच्या नोंदी करुन क्रमांकाचे बिल्ले दिले जातात. त्यांना नागरी सुविधा पुरवण्यासाठी स्वतंत्र पथक तैनात करण्यात आले आहेत. बुलडाणा जिल्ह्यातून ३९ तर नाशिक येथून ४४ दिंड्या पायी दाखल झल्या आहेत. पुणे २०, वाशीम ३, अकोला ५, यवतमाळ २, जळगाव १०, हिंगोली ३, धुळे १, सोलापूर १०, नांदेड १, परभणी २४, जालना ८९, धाराशिव ६, अहिल्यानगर ११९, बीड ९० व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १२२ दिंड्यांचा समावेश आहे. यात्रा मैदानासह वाळवंट व इतरत्र फिरती शौचालयांच्या सुविधा देण्यात आल्या आहेत. पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणी पथके, स्वच्छता पथके, वाहतुक नियंत्रक पथके आदी तैनात आहेत. तसेच पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.



## आझाद चौकात अग्नितांडव; १७ दुकाने खाक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



सिडको भागातील आझाद चौकातच असलेली १६ दुकाने गुरुवारी पहाटे ४.३० च्या सुमारास आगीच भक्ष्यस्थानी पडली. चौकातच महावितरणचे रोहित्र आहे. त्यातून निघालेल्या ठिणग्या पडून आग लागल्याचा प्राथमिक अंदाज असून, दुकाने जळालेल्या मालकांकडूनही तसा आरोप करण्यात आला आहे. त्या संदर्भाने एक तक्रारही जिन्सी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्याचे काही दुकानदारांनी सांगितले.

आगीची घटना पाहिलेल्या काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, सकाळच्या सहेरच्या नमाजासाठी उठलो त्यावेळी आग बऱ्याच प्रम णात पसरत असल्याचे निदर्शनास आले. आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाला देण्यात आली. अग्निशमन विभागाकडेही ५ वाजून ३८ मिनिटांनी प्रथम संपर्क (कॉल) केल्याचे सांगण्यात आले. अग्निशामक शेख अब्दुल वासे नासेर यांनी आझाद चौकातील दुकानांना आग लागल्याचे कळवले.

आगीच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर एस. के. भगत, व्ही. के. राठोड व अशोक खांडेकर हे अधिकारी, ८ प्रमुख अग्निशमक अधिकारी, ३५ कर्मचारी, अधिकाऱ्यांचे पथक रवाना झाले. सिडको, सिडको एन-९, चिकलठाणा, पदमपुरा या चार अग्निशमन केंद्रातील चार बंब, एक गरवारेचा, वाळूज व शेंद्र औद्योगिक वसाहत मंडळाची मिळून तीन अशी एकूण आठ बंब व सहा ते सात पाण्याचे टँकरही मागवण्यात आले. टँकरच्या प्रत्येकी तीन फेऱ्या करून पाण्याचा मारा करण्यात आला. सुमारे पाच तासांनंतर आग पूर्णपणे नियंत्रणात आणण्यात आल्याचे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. आग लागलेली दुकाने प्रामुख्याने लाकडी फर्निचरची अधिक असल्याने आग झपाट्याने पसरत गेली. अवघ्या काही क्षणातच आगीने रौद्ररुप घेतले होते. आग विझवल्यानंतर सर्व लाकडी साहित्याचा अक्षरश: कोळसा झालेला होता. तर छतावरील पत्रेही मुडपून गुंडाळली गेली होती.

सेवानिवृत्त शिक्षकाचा पत्नीकडूनच डोक्यात दगड टाकून खून - आझाद चौकातील रोहित्रा लगतच असलेले रॉयल स्टिल व बाजूच्या अयूबभाई, सय्यद अल्ताफ, सरदारभाई, अनवर खान, वारीस देशमुख, राजीकभाई, फरीदभाई, आतिक मौलाना, सलमानभाई, वसीमभाई, सिराजभाई, अफसर पठाण, कलीमभाई, माजीदभाई, मागील बाजूचे दरवाजे तयार करणारे अजमद खान यांची दुकाने आगीत खाक झाली. रॉयल स्टिलच हे दुकान घरांमधील स्वयंपाकगृहातील कपाटे, टेबल तयार करणारे असून, तेही पूर्णपणे जळून गेले. कपाटे, टेबल तयार करणारे त्यांचे मशीनही जळाल्याची माहिती देण्यात आली. या घटनेत कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. रोहित्राजवळच माजीनगरसेवक अय्यूब जहागीरदार यांचा दोन मजला बंगला असून, त्यांच्या घराच्या भिंतीही काळवंडल्या आहेत. घरावर उंच एक मनोरा असून, तेथपर्यंत आगीच्या ज्वाळा पोहोचल्या होत्या.

## पुण्यात चालकाच्या वैयक्तिक रागामुळे चार जण होरपळले

पुण्यातील हिंजेवाडी भागात बुधवारी सकाळी एका मिनी बसनं अचानक पेट घेतल्यानं खळबळ उडाली. हिंजेवाडी परिसरातील आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घर ते ऑफिस आणि पुन्हा ऑफिस ते घर अशी प्रवास सेवा पुरवणाऱ्या या मिनी बसने पेट घेतल्यानंतर त्यात चार जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ८ जण जखमी झाले. पण या प्रकरणाला आता मोठी कलाटणी मि ळाली असून चालकानंच वैयक्तिक रागातून बस पेटवून दिल्याचं स्पष्ट झालं आहे. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. पण पोलिस तपासात नवी माहिती समोर आली आहे.

**पुण्यात नेमकं काय घडलं?**

बुधवारी हिंजेवाडी भागातील व्योम ग्राफिक्स कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वारजे माळेवाडी भागातून कंपनीत नेण्यासाठी ही मिनी बस आली होती. हिंजेवाडी फेज एक परिसरात येताच मिनी बस चालू असतानाच तिनं पेट घेतला. काही क्षणांत आगीचा भडका उडाला आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. याआधीच चालक व पुढच्या भागात बसलेल्या काहींनी बाहेर उड्या टाकल्या होत्या. पण मागे बसलेल्या चौघांना बाहेर पडता आलं नाही.

मिनी बसमध्ये शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात होता. आयटी कर्मचारी संघटनेकडून यासंदर्भात निषेधही व्यक्त करण्यात आला होता. या मिन बसेसचं सेफटी ऑडिट केलं जात नाही, असा आरोप करण्यात आला होता. पण आता ही आग शॉर्ट सर्किटमुळे नसून या बसच्या चालकानंच लावली होती, असा धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

**पोलिसांना कुठे आला संशय?**

दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा सविस्तर तपास केला असता नेमकं कारण उघड झाल्याची माहिती पुणे पोलिसांनी यासंदर्भात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिनी बसचा चालक जनार्दन हंबर्डीकर गेल्या १२ वर्षांपासून संबंधित कंपनीसोबत काम करत होता. पण कंपनीत काही लोकांकडून आपल्याला दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा राग त्याच्या मनात होता. या रागातून त्यानं हे कृत्य केल्याचं नंतर पोलिस तपासात कबूल केलं आहे.

## 'चिमण्यांसाठी घराबाहेर पाण्याचा घडा ठेवा'

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मानव जेव्हापासून वस्ती करून राहू लागला तेव्हापासून त्यांच्या आजूबाजूला चिमणीचा अधिवास आहे. त्यामुळे चिमण्यांच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी आपण सगळ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा 'इंडियन स्पॅरोमॅन' म्हणून ओळखले जाणारे व नेचर फॉरएव्हर सोसायटीचे अध्यक्ष मोहम्मद दिलावर यांनी व्यक्त केली. चिमण्यांच्या संवर्धनासाठी घराबाहेर पाण्याचा पड़ा ठेवा, नेस्ट बॉक्स आणि फीड बॉक्स बसवा, पार्किंग लॉट आणि सोसायटीमध्ये नेस्ट बॉक्स ठेवा, असे आवाहनही या कार्यशाळेच्या माध्यमातून त्यांनी केले. जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ताने मुंबई पालिका व नेचर फॉर एव्हर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील पेंग्विन इमारत सभागृहात गुरुवारी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत मोहम्मद दिलावर बोलत होते. मुंबई पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उपायुक्त (उद्याने) चंदा जाधव यांच्या म ार्गदर्शनाखाली हो कार्यशाळा पार पडली.

## कमावण्याची क्षमता असलेल्या सक्षम महिलांनी पोटगी मागू नये

नवी दिल्ली:'सक्षम महिलांनी पतीकडून पोटगी मागू नये, नोकरीचा योग्य अनुभव असलेली सुशिक्षित पत्नी फक्त पतीकडून पोटगी मिळवण्यासाठी बेरोजगार राहू शकत नाही', असे निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदविले आहे.दरम्यान, उच्च न्यायालयात अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी एक याचिका दाखल करण्यात आली होती. पत्नीने दाखल केलेली ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

तसेच कमावण्याची क्षमता असलेल्या सक्षम महिलांनी पोटगी मागू नये, अशी महत्वाची टिप्पणी केली. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयावर स्पष्टीकारण देखील दिलं. कायदा आळशीपणाला प्रोत्साहन देत नाही आणि कमाईची क्षमता असलेल्या पात्र महिलांनी त्यांच्या पतींकडून अंतरिम पोटगीसाठी दावा देखील करू नये. कायद्याचे उद्दिष्ट हे सम ानतेचे असून आळशीपणाला प्रोत्साहन देणे नाही, असे स्पष्ट करत,विभक्त पतीकडून अंतरिम पोटगीसाठी महिलेची याचिका न्यायालयाने फेटाळली.

## विद्यार्थ्याचा मृत्यू होताच नवी मुंबई मनसेची इमॅजिका पार्कला धडक

नवी मुंबई (प्रतिनिधी) : रखरखत्या उन्हात शालेय सहल काढणे अत्यंत चूक आहे. इमॅजिका पार्कने पुरेशी पाण्याची व्यवस्था न करणे तसेच जेवणासाठी चायनीज ठेवणे हे व्यवस्थापनाच्या मूर्खपणाचे लक्षण आहे. अशा अनेक चुका इमॅजिका पार्क व्यवस्थापनाने करूनही आयुष सिंग याच्या पालकांना कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. याबद्दल ही तीव्र नाराजी मनसे पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

तसेच इमॅजिका पार्कने या पुढे शासन निर्णयानुसार शालेय सहली आयोजित करू नये अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करावे लागेल असा इशाराही मनसेचे नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी दिला आहे. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या वतीने विविध पालिका शाळांच्या किमान १२०० विद्यार्थ्यांना घेवून खोपोली येथील इमॅजिका पार्क येथे सहल नेण्यात आली होती.

## महिलांना खऱ्या अर्थाने समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध - वनमंत्री गणेश नाईक

**ठाणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पतीच्या खांद्याला खांदा लावून आपल्या संसाराचा गाडा ओढत असताना असक्षम महिला भगिनींना, राजकीय, सामजिक आणि आर्थिक बळ देवून त्यांना खऱ्या अर्थाने सम ानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी आज येथे केले.

महिला आर्थिक विकास म हामंडळाची (माविम) यशस्वी ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल माविम सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून आज नवी मुंबईतील वाशी सिडको प्रदर्शन केंद्र येथे झालेल्या ङ्गमाविम सुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ङ्ख च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

दि. २० ते २५ मार्च २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, गृहउपयोगी साधन सामग्री असलेल्या जिल्हास्तरीय माविम ङ्गसुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ङ्ख प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झाले. सुरुवातीस मंत्री नाईक यांनी प्रदर्शनाची पाहणी केली व स्टॉलला भेटी देवून स्टॉलमध्ये विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या वस्तू व पदार्थांची माहिती घेतली.

या सोहळ्याप्रसंगी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रशांत ठाकूर, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, महिला व बालविकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा- उंटवाल, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, इफाड च्या राष्ट्रीय समन्वयक मीरा मिश्रा, शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी तसेच महाराष्ट्राच्या विविध ठिकाणांहून आलेल्या बचतगटांच्या महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीप प्रज्वलनाने या उद्घाटन सोहळ्याचा शुभारंभ झाला.

वनमंत्री गणेश नाईक हे उपस्थित सर्व महिलांना माविमच्या सुवर्णम ेहोत्सवी दिनाच्या शुभेच्छा देत म्हणाले की, आदिती तटकरे आणि मेघना साकोरे- बोर्डीकर या दोन महिला मंत्र्यांच्या नेतृत्वाने माविम च्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी वर्षाला उत्तम गती मिळेल.

मंत्री नाईक पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी महिलांना सक्षम करण्याची फक्त इच्छाच व्यक्त केली नाही, तर त्याअनुषंगाने दमदार पावलेदेखील उचलली आहेत. म हिलांना पाण्यासाठी वणवण फिरायला लागू नये, यासाठी जलजीवन मिशन युद्धपातळीवर राबविण्यात आले. अन्न, वस्त्र, निवारा आणि महिलांचा सन्मान यानुषंगाने पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांची भूमिका सकारात्मक आहे. महाराष्ट्र राज्यात जेव्हा महिलांच्या विकासासाठी काही अपेक्षा केली तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह सर्व मंत्रिमंडळाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. जोपर्यंत महिला सक्षम होत नाही तोपर्यंत कुटुंब सक्षम होत नाही, असे म्हणत येणाऱ्या कालखंडात महिला अधिक सक्षम होतील, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी यावेळी व्यक्त केला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माविमचा सुवर्ण महोत्सव आपण आज साजरा करू शकलो कारण माविमच्या प्रत्येक घटकाने माविमच्या यशासाठी मोलाचा वाटा उचलला आहे. खऱ्या अर्थाने सगळ्यांचे कष्ट आणि माविमला प्रतिसाद देणारी प्रत्येक महिला ही आजच्या या सोहळ्याची तितकीच समान मानकरी आहे, जितकी या विभागाची प्रतिनिधी म्हणून मी आहे.

पान २ वर

# पंतप्रधान मोदींच्या ३८ परदेश दौऱ्यांवर २५८ कोटींचा खर्च! केंद्राने संसदेत दिली सविस्तर माहिती

केंद्र सरकारने गुरूवारी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांच्या खर्चाचा तपशील जारी केला आहे. यानुसार मोदी यांच्या मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या ३८ परदेश दौऱ्यावर जवळपास २५८ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

या ३८ दौऱ्यांपैकी सर्वाधिक खरचब हा जून २०२३ मध्ये केलेल्या अमेरिका दौऱ्याच्या वेळी झाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीसाठीसाठी २२ कोटी रुपयांहून अधिकचा खर्च झाला, पीटीआय या वृत्त वाहिनीने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. ही माहिती परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिटा  यांनी गुरूवारी राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली आहे.



विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यासंबंधीचा प्रश्न विचारला होता. त्यांनी भारतीय दूतावासांनी गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांसाठी एकूण किती खर्च केला याबद्दल खरगे यांनी विचारणा केली होती. ज्यामध्ये हॉटेल व्यवस्था, सामूहिक स्वागत समारंभ, वाहतूक याबरोबरच इतर खर्चाचा तपशील देखील विचारण्यात आला होता. दरम्यान या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांसाठी झालेला खर्च तसेच अधिकार्यांवर झालेला खर्च, सोबत असणारे लोक, माध्यम डेलिगेशन, सुरक्षा व्यवस्था इत्यादींवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. सविस्तर देण्यात आलेली ही माहिती मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यांची आहे. सरकारकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, जून २०२३ रोजी केलेल्या अमेरिका दौऱ्यावर २२,८९,६८,५०९ रुपये इतका खर्च झाला होता, तर सप्टेंबर २०२४ मध्ये केलेल्या अमेरिकेच्या दौऱ्यावर १५,३३,७६,३४८ रुपये खर्च झाला.

दुसऱ्या काही महत्त्वाच्या दौऱ्यांपैकी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मे २०२३ मधील जपान दौऱ्यावर १७,१९,३३,३५६ रुपये आणि नेपाळच्या मे २०२२ मधील दौऱ्यावर ८०,०१,४८३ रुपये खर्च झाला.

कोणत्या देशांना भेटी दिल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ आणि २०२४ यांच्या मध्ये जर्मनी , कुवेत, डेन्मार्क, फ्रान्स, यूएई, उझबेकीस्तान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, दक्षिण अफ्रिका, ग्रीस, पोलंड, युक्रेन, रशिया, इटली, ब्राझील, गयाना या देशांना भेटी दिल्या आहेत.

कोणत्या दौऱ्यावर किती खर्च झाला?

पोलंड - १०,१०,१८,६८६ रुपये
युक्रेन - २,५२,०१,१६९ रुपये
रशिया - ५,३४,७१,७२६ रुपये
इटली - १४,३६,५५,२८९ रुपये
ब्राझील - ५,५१,८६,५९२ रुपये
गयाना - ५,४५,९१,४९५ रुपये

पंतप्रधान मोदींच्या मे २०२२ ते डिसेंबर २०२४ या काळातील ३८ दौऱ्यांचा खर्च सुमारे २५८ कोटी रुपये इतका आहे.  मोदींच्या दौऱ्यांची तुलना करण्यासाठी मंत्र्यांनी २०१४ पूर्वी माजी पंतप्रधानांनी केलेल्या मागील परदेश दौऱ्यांच्या खर्चाची माहिती देखील देण्यात आली आहे.

# ‘महाराष्ट्र भूषण’ शिल्पकार ‘राम सुतार’!

**भारताचा कला व सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्राचं नाव विविध क्षेत्रात मोठ करणाऱ्या दिग्गजांच्या यादीत मुळचे धुळ्याचे व सध्या दिल्लीलगत नोएडा शहरात वास्तव्यास असणारे जागतिक किर्तीचे शिल्पकार पद्मभूषण राम सुतार हे नाव अढळ ताऱ्याप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत घोषित केला. त्यांचे नाव अगोदरच गुजरातमधील केवडिया कॉलनीतील लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’ या शिल्पांमुळे आंतरराष्ट्रीयर पातळीवर चर्चीले जात आहे. नेहमीच देश आणि विदेशातील शिल्पकलेच्या क्षेत्रात आचाट प्रयोग करणारे पद्मभूषण राम सुतार यांचा धुळे ते दिल्ली पर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.**



देश-विदेशातून भारतीय लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला अर्थात संसदेला भेट देणाऱ्या प्रत्येक नागरीकास सुतार यांच्या कामाचे सर्वांग सुंदर व सर्वोत्तम स्वरूप पहायला मिळते ते त्यांच्या कलाकृतीमधून. संसदेच्या आवारात उभारलेल्या महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह देशाला मार्गदर्शक ठरणाऱ्या महान व्यक्तीमत्त्वांचे १६ पुतळे सुतार या मराठी शिल्पकाराने साकारले आहेत. सरासरी १६ ते १८ फुटांच्या धातूनिर्मित या पुतळ्यांनी लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला वेगळी उंची प्रदान केली आहे. राम सुतार यांच्या शिल्पकलेतील उंचीचा हा अल्प परिचय मिळाल्यानंतर आपणास निश्चितच उत्सुकता लागली असेल या कलावंताचे महाराष्ट्रातील मूळ गांव व त्यांचा शिल्पकलेतील प्रवास जाणून घेण्याचा. वाचकांच्या मनातला नेमका हाच प्रश्न त्यांना विचारला तेव्हा ते भावूक झाले.

धुळे शहरापासून २ ते ३ मैलावर असणाऱ्या गोंदूर या गावचा माझा जन्म. वडील वंजीहंसराज सुतार हे व्यवसायाने सुतार असल्याने कलेचा संस्कार घरातूनच आला. शेतीसाठी लागणारी अवजारे, बैलगाडी आदी वस्तू माझे वडील खूपच आखिव रेखीव पद्धतीने तयार करीत असत. त्यातूनच मला चित्र रेखाटण्याची व शिल्प साकारण्याची आवड निर्माण झाली हे सांगताना सुतार आपल्या शालेय दिवसांमधे रमल्याचा भास होत होता. शालेय जीवनात शिक्षकांनी माझ्यातील कलाकार ओळखून दिलेल्या प्रोत्साहनामुळे माझ्यातील कलाकाराची पायाभरणी झाली. गावात चौथी पर्यंत शाळा. पुढे पाचवी शिकायला म्हणून निमजाळे या गावातील शाळेत प्रवेश घेतला. सहा फूट उंचीच्या पहीलवानाचा सिमेंटचा पुतळा साकारून १९४७ मधे सुतार यांनी आयुष्यात पहिले शिल्प तयार केले. १९२५ मधे जन्मलेल्या राम सुतार यांनी आजतागायत शेकडो शिल्प तयार केली असून जगातील जवळपास ८० देशात उभारण्यात आलेल्या महात्मा गांधी यांच्या शिल्पासह २५० शिल्पांचा यात समावेश आहेः

पुढे धुळ्यातील शिक्षक प्रशिक्षण संस्थेत सुतार जाऊ लागले. इथेच त्यांनी चित्रकलेच्या प्राथमिक परिक्षाही उत्तीर्ण केल्या. त्यांच्या उत्तम कामामुळे इथेच त्यांना चित्रकलेतून पैसेही मिळू लागले. शिक्षक प्रशिक्षण केंद्रात शिक्षकांना मॉडेल व चित्र तयार करून देण्याच्या मोबदल्यात त्यांना प्रती वस्तू पाच रूपये मिळकत मिळू लागली. आता सुतार यांना कामातही आंनद वाटू लागला. १९४८ साली शिक्षक प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक श्रीरामकृष्ण जोशी यांच्याकडून महात्मा गांधी यांचे सिमेंटचे शिल्प तयार करण्याची ऑर्डर मिळाली. त्यांनी महात्मा गांधीचे चार फुटांचे सिमेंटचे शिल्प तयार केले. मोबदल्यात त्यांना १०० रूपये मिळाले. ही शिल्पातून मिळालेली त्यांची पहिली कमाई. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या व्यक्तीमत्त्वाचा मोठा प्रभाव आहे. सुतार जेमतेम दुसरीत असतानाच गांधीजींनी त्यांच्या गावाला भेट दिल्याची घटना आजही त्यांना स्मरते. परदेशी कापडांच्या होळीत सक्रीय सहभाग घेत सुतार यांनी त्यावेळी आपल्या डोक्यातील गोल मखमलीची टोपी या होळीत टाकल्याचे ते सांगतात. पुढे महात्मा गांधींचे शिल्प उभारण्याची संधीच त्यांना मोठ्या प्रमाणात मिळत गेली. सुतार यांच्या कलात्मक हातातून गुजारतमधील गांधीनगर येथे सचिवालयात उभारण्यात आलेल्या महात्मा गांधीजींच्या अलौकीक शिल्पासाठीच त्यांना पद्मश्री या मानाच्या नागरी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

रामकृष्ण जोशी यांच्या मदतीने राम सुतार मुंबईला गेले व माटुंग्यात राहू लागले. १९४९ मधे त्यांनी मुंबईतील प्रसिद्ध जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधे प्रवेश घेतला. शैक्षणिक योग्यतेमुळे त्यांना थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला व त्यांनी चार वर्षातच शिक्षण पूर्ण केले. इथेही त्यांनी चारही वर्ष प्रथम येण्याचा मान मिळवत मेयो पदक पटकाविले.

यानंतर त्यांनी जे.जे. म्हात्रे आणि करमरकर या तत्कालीन प्रसिद्ध शिल्पकारांसोबत काम केले. याच काळात केंद्रीय लोकसेवा आयोगाने वेरूळ व अंजिठा या जगप्रसिद्ध लेण्यांच्या देखभालीसाठी आर्टीस्टची परीक्षा घेतली. ही परीक्षा उत्तीर्ण करून सुतार यांनी १९५४ ते १९५८ या कालावधीत या लेण्यांतील मुर्त्यांच्या डागडूजीचे काम यशस्वीपणे केले. १९५९ मध्ये त्यांनी दिल्लीस्थित केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत कार्यरत जाहीरात व दृष्य प्रचार संचालनालयाची (डीएव्हीपी) नोकरी स्वीकारली आणि तेव्हापासूनच ते दिल्लीत स्थायिक झाले. दिल्लीतील प्रगती मैदानावरील कृषी प्रदर्शनात सुतार यांनी उभारलेला शेतकऱ्याचा पुतळा अधिकाऱ्यांना फारच आवडला व त्यांनी लगेच सुतारांची भेट घेऊन त्यांना दोन शेतकरी जोडप्याचे दोन पुतळे बनविण्याची ऑर्डर दिली. त्यांनी शेतकरी महिला व पुरूष असे प्रत्येकी १३ फुटाचे दोन पुतळे तयार केले त्याचा मोबदला म्हणून सुतार यांना १५ हजार रुपये मिळाले. हा क्षणच त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. सरकारी नोकरीत राहून तूम्ही हे काम करू शकत नाही असे त्यांच्या डीएव्हीपीतील अधिकाऱ्याने सांगितले. सुतार यांनाही आता राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कला दाखविण्यासाठी स्वतंत्र काम करण्याची निकड भासू लागल्याने त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

याच काळात तत्कालीन केंद्रीय लोकनिर्माण विभागाचे मुख्य वास्तुविशारद जोगडेकर यांना सुतार यांच्या कामाविषयी कळताच त्यांनी सुतार यांना बोलावून घेतले. केंद्र सरकातर्फे पाच फुटांचे अशोकस्तंभ उभारण्याचे काम त्यांनी सुतार यांना सोपवले. खूप अशोकस्तंभ उभारायचे होते. पण हा प्रकल्प लवकरच बंद झाला. त्यातच त्यांना भोपाळला बोलवणे आले. मध्यप्रदेश सरकारने मध्यप्रदेश व राजस्थानमधून वाहणाऱ्या चंबळ नदीवर गांधीसागर धरण बांधायला सुरुवात केली होती. या धरणासाठी दहा हजार रूपयांमधे चंबळदेवीचे ४५ फूट उंचीचे शिल्प कॉंक्रीटमध्ये कोरण्याचे काम त्यांनी स्वीकारले. चंबळदेवी आणि तिला कवटाळणाऱ्या मध्य प्रदेश आणि राजस्थान या दोन मुलांच्या बंधुत्वभाव व्यक्त करणारे अप्रतिम शिल्प १८ महिन्यात तयार झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी या पुतळ्याचे अनावरण केले होते. हा पुतळा बघून प्रभावित झालेल्या पंडित नेहरूंनी सुतारांना पंजाबमधील भाक्रा धरणावर श्रमिकांची शिल्पकृती उभारण्याचा मनोदय बोलून दाखवला पण दुर्दैवाने ही शिल्पकृती पूर्ण होऊ शकली नाही आणि त्याच ठिकाणी सुतारांनी पंडित नेहरूंचा १८ फुट उंचीचा पुतळा उभारला. यानंतर संसदेच्या आवारात उभारण्यात आलेले महापुरूषांचे १६ पुतळे आणि महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विदेशात महात्मा गांधीचे पुतळे उभरण्याचे काम करीत जवळपास ८० देशांमधे गांधीसह इतर ३५० पुतळे उभारण्याची किमया या मराठी अवलीया शिल्पकाराने केली आहे.

गुजरातमध्ये बसविण्यात आलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भव्य पुतळ्याचेही ते आणि त्यांचा मुलगा अनिल सुतार यांनी काम केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याबाबत सांगायचे झाले तर त्या पुतळ्याची प्रत्यक्ष उंची ५२२ फूट आहे. सरदारांच्या पुतळ्याची उंची नदीपात्रापासून ६०७ फूट (१८२ मीटर) आहे. एकात्मतेचे स्मारक (स्टॅच्यू ऑफ युनिटी) म्हणून नामाभिधान केलेला सरदारांचा पुतळा सरदार सरोवर धरणाजवळील साधू बेटावर उभा केला आहे. अरबी समुद्रातील शिवस्मारक, इंदू मिलचे प्रस्तावित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा १८२ मीटरचा पुतळा ही तिन्ही शिल्पे राम सुतार यांच्या कल्पनेतूनच साकारत आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांना केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून देण्यात येणारा २०१६ या वर्षासाठीचा टागोर पुरस्कार जाहीर झाला. एक कोटी रुपये, प्रमाणपत्र आणि पारंपारिक हस्तकला शिल्प असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आता महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांचा सन्मान होणार आहे.

सुतार यांच्या कलेचा वारसा त्यांचे एकुलते एक चिरंजीव अनिल सुतार सांभाळत आहेत. अनिल सुतार यांना लहानपणापासूनच वडिलांच्या शिल्पकलेने प्रचंड वेड लावले. मुलाची शिल्पकलेतील गती पाहता सुतार यांनी अनिल यांना शिल्पकलेच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. दिल्लीतच पदवी शिक्षण पूर्ण करून अनिल यांनी अमेरिकेतून शिल्पकलेचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पाटण्यात महात्मा गांधीचा पुर्णाकृती पुतळा आणि कोलकाता येथील सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारण्यात अनिल यांनी वडीलांसोबत सहायक शिल्पकाराची भूमिका बजावली आहे. अनिल यांनी आपल्या वडीलांना गुरूदक्षिणेच्या स्वरूपात त्यांच्या शिल्पकेलेतील प्रवासावर आधारीत दोन पुस्तकके प्रकाशित केली आहेत. मुलाच्या शिल्पकलेतील गतीबाबत सुतार संतुष्ट आहेत. या वयातही शिल्पकलेच्या माध्यमातून मातीशी संवाद साधण्याची सुतार यांची साधना अखंडपणे सुरु आहे. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीला भोवऱ्याची उपमा देताना सुतार म्हणतात, ‘भोवऱ्याला जसजशी उतरण मिळेल तसतसा तो फिरत जातो,  तसे माझ्या बाबतीत घडले आहे’. त्यांच्या मनात महाराष्ट्राविषयी नितांत प्रेम आहे. मनात खोलवर बिंबलेले गोंदूर (ता.धुळे) गावच्या मातीतले संस्कार घेऊनच शिल्पकलेतील हा सर्वप्रवास असल्याचे भाष्य करणाऱ्या आभाळभर किर्तीच्या पद्मविभूषण राम सुतार यांच्या कार्याला मानाचा मुजरा.

**- रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

# तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी

नवी दिल्ली : सरकारने तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी दिली. ज्यामध्ये लष्कराच्या रणगाड्यांसाठी अधिक शक्तिशाली इंजिन, नौदलासाठी पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आणि हवाई दलासाठी पाळत ठेवणारी प्रणाली एडब्ल्यूएसीएस खरेदीचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज, गुरुवारी झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत या संदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. परिषदेने बैठकीत ५४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या ८ भांडवली अधिग्रहण प्रस्तावांना आवश्यकता स्वीकृती दिली.

या करारांमध्ये लष्करासाठी असलेल्या टी-९० टँकच्या विद्यमान १००० एचपी इंजिनांना अपग्रेड करण्यासाठी १३५९ एचपी इंजिनांच्या खरेदीला मंजुरी समाविष्ट आहे. यामुळे या रणगाड्यांची युद्धभूमीतील गतिशीलता वाढेल, विशेषतः उंचावरील भागात, कारण त्यामुळे शक्ती-ते-वजन गुणोत्तर वाढेल. भारतीय नौदलासाठी, वरुणास्त्र टॉर्पेडो (लढाऊ) खरेदीलाही मान्यता देण्यात आली आहे. वरुणास्त्र टॉर्पेडो हा नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेने विकसित केलेला स्वदेशी विकसित केलेला जहाजावरून सोडला जाणारा पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आहे. नौदलात या टॉर्पेडोचा मोठ्या प्रमाणात समावेश झाल्यामुळे, शत्रूच्या पाणबुड्या नष्ट करण्याची त्यांची क्षमता वाढेल.

गरजेनुसार, भारतीय हवाई दलासाठी एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल (एडब्ल्यूएसीएस) प्रणाली खरेदी करण्यासही परिषदेने मान्यता दिली. एडब्ल्यूएसीएस प्रणाली हवाई दलाच्या क्षमता वाढवेल आणि युद्धाच्या संपूर्ण क्षेत्राला बदलण्यास सक्षम आहे.संरक्षण मंत्रालयाने २०२५ हे वर्ष ‘सुधारणांचे वर्ष’ म्हणून पाळले असल्याने, परिषदेने भांडवल अधिग्रहण प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर वेळेची मर्यादा कमी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता दिली जेणेकरून ती जलद, अधिक प्रभावी आणि कार्यक्षम होईल.

पान १ वरून

# महिलांना खऱ्या अर्थाने समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध - वनमंत्री  गणेश नाईक

माविमला यशस्वी करण्यासाठी खूप कठीण प्रसंगांचा सामना करावा लागला आणि आज माविममधे २० लाखांहून अधिक महिला साहभागी झाल्या आहेत. माविमला केवळ राज्य अनब राष्ट्रीय स्तरावरच नाही तर थेट आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मानित करण्यात आले आहे. सगळ्या बचतगटांच्या चळवळीत माविमच आयडियल मॉडेल आहे. कारण माविम कोणावरही अवलंबून न राहता महिलांना कर्ज देते.  माविमच्या महिला बचतगटांचा कर्ज परतफेडीचा दर ९९.०५ टक्के आहे. याचा मला अभिमान आहे, असे सांगून आदिती तटकरे यांनी माविमच्या महिलांचे अभिनंदन केले.

त्या पुढे म्हणाल्या की, आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव ठेवला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांवर प्रत्येक ३५ ते ५० किलोमीटरच्या अंतरावर महिलांसाठी स्वच्छ सुंदर शौचालये बांधण्यात यावे आणि त्या शौचालयाच्या जवळपास स्टॉल उपलब्ध करून दिल्यास माविमच्या माध्यमातून त्या स्टॉलवर होणाऱ्या उत्पादनांच्या विक्रीतून शौचालयांच्या देखभालीचा खर्च भागविला जावू शकतो. तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून उमेद प्रमाणे तालुक्याच्या प्रत्येक नगरपंचायतीच्या बाजारपेठेच्या ठिकाणी माविमचे स्वतंत्र अस्मिता भवन उभारण्यात येईल. असा प्रस्तावच शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

या अस्मिता भवनात माविमच्या महिलांची उत्पादने, विक्रीसाठी स्टॉल, माविमची कार्यालये, प्रशिक्षण केंद्र असणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी माविमच्या विस्ताराची मागणी मान्य केली असून, माविममधील महिलांची संख्या २० लाखांहून किमान ५० लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट आम्ही या सुवर्ण महोत्सवी दिवशी ठरविले आहे.

राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे- बोर्डीकर यांनी नुकत्याच अंतराळात ९ महिने राहून पृथ्वीवर परतलेल्या सुनिता विल्यम्स यांचा दाखला देत स्त्रीशक्तीच्या इच्छाशक्ती आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले. माविमच्य महिलांचे कष्ट आणि त्यांच्या यशकथा पाहून मला अभिमान वाटतो, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी माविम च्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या रमा कांबळे, स्वाती विठ्ठल शेळके, वैशाली वसंत पाटील, रोहिणी भानुदास कुसमागडे, शशिकला नारायण डांगे, मंजुताई राजेंद्र ठाकरे, संगिता कोळी या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी माविमच्य महिला बचतगटांच्या यशकथा तसेच त्यांची उत्पादने याची माहिती असणाऱ्या एकूण ३ कॅटलॉगचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकपर भाषणात महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी माविमबद्दल सविस्तर माहिती दिली. महिलांना गुंतवणुकदारांसाठी रेड कार्पेट, उद्योजकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणार - विजयलक्ष्मी बिदरी

# विद्यार्थ्यांचा मृत्यू होताच नवी मुंबई मनसेची इमॅजिका पार्कला धडक

नवी मुंबई (प्रतिनिधी) :

रखरखत्या उन्हात शालेय सहल काढणे अत्यंत चूक आहे. इमॅजिका पार्कने पुरेशी पाण्याची व्यवस्था न करणे तसेच जेवणासाठी चायनीज ठेवणे हे व्यवस्थापनाच्या मूर्खपणाचे लक्षण आहे. अशा अनेक चुका इमॅजिका पार्क व्यवस्थापनाने करूनही आयुष सिंग याच्या पालकांना कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. याबद्दल ही तीव्र नाराजी मनसे पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. तसेच इमॅजिका पार्कने या पुढे शासन निर्णयानुसार शालेय सहली आयोजित करू नये अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करावे लागेल असा इशाराही मनसेचे नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी दिला आहे.

२५ फेब्रुवारी २०२५ रोजी नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या वतीने विविध पालिका शाळांच्या किमान १२०० विद्यार्थ्यांना घेवून खोपोली येथील इमॅजिका पार्क येथे सहल नेण्यात आली होती. यावेळी घणसोली शाळा क्र. ७६ येथील हिंदी माध्यमातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या आयुष सिंग वय वर्ष १४ या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. सदरच्या घटनेला इमॅजिका पार्क व्यवस्थापन, नवी मुंबई मनपाचे प्रशासन जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. या संदर्भात न्याय मागण्यासाठी मनसे प्रवक्ते, मनविसे सरचिटणीस, नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या नेतृत्वाखाली म नसेच्या शिष्टमंडळाने इमॅजिका पार्कचे व्यवस्थापक शिवराज नायर यांची भेट घेतली.

इमॅजिका पार्कवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक ठिकाणीच शाळा सहल नेऊ शकतात, असा महाराष्ट्र सरकारचा शासन निर्णय असताना इमॅजिका पार्क या सहली आयोजित कसे करू शकतात?, असा प्रश्न उपस्थित केला. नफेखोरीसाठी इमॅजिका पार्क लहान मुलांचा जीव धोक्यात का घालते, असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला. इमॅजिका पार्ककडे झालेल्या घटनेचा अहवाल मनसे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी मागवला असता, इमॅजिका पार्क व्यवस्थापनाकडे असा अहवाल उपस्थित नसल्याचे पाहून बघून सर्वांनी राग व्यक्त केला. उपस्थित वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना इमॅजिका पार्कवर गुन्हा दाखल करण्याची विनंती मनसेच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली. तसेच शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, असे ही सांगण्यात आले.

शिष्टमंडळात नवी मुंबईसह रायगडच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग

मनसेच्या शिष्टमंडळात मनसे प्रवक्ते गजानन काळे, रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, मनविसे रायगड जिल्हा अध्यक्ष प्रसन्ना बनसोडे, मनविसे नवी मुंबई शहर अध्यक्ष संदेश डोंगरे, महिला सेना नवी मुंबई शहर अध्यक्ष डॉ. आरती धुमाळ, महिला सेना रायगड जिल्हा अध्यक्ष आदिती सोनार, नवी मुंबई मनसे शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, शहर सह सचिव अभिजीत देसाई, , मनसे कामगार सेना सरचिटणीस अभिषेक दर्गे, म ाथाडी सेना सरचिटणीस महेश सोगे, महिला सेना शहर सचिव यशोदा खेडसकर, मनसे नवी मुंबई विभाग अध्यक्ष अमोल आयवळे, भूषण कोळी, अक्षय भोसले, नितीन नाईक, शाम ढमाले, रोहन पाटील, विशाल चव्हाण, सनप्रीत तुर्मे कर, रायगड जिल्हा विद्यार्थिनी अध्यक्ष रुचिता सोनार, मनविसे कर्जत तालुका अध्यक्ष प्रविण राणे, मनविसे खालापूर तालुका अध्यक्ष चेतन चोगले, भारती कांबळे, अनिकेत पाटील, प्रतिक खेडकर, मधुर कोळी, प्रद्युमन हेगडे हे उपस्थित होते.

# विधिमंडळात आदित्य ठाकरेंच्या अटकेची मागणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बॉलिवूड अभिनेता सुशांतसिंह राजपूतची व्यवस्थापक दिशा सालियनच्या मृत्यूप्रकरणी तिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेचे पडसाद गुरुवार विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटले. विधानसभेत मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे आणि पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सालियन मृत्यू प्रकरणी आरोप असलेल्या माजी मंत्र्यांना अटक करण्याची मागणी केली. यावेळी त्यांचा रोख शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या दिशेने होता. तर विधान परिषदेतही सत्ताधारी पक्षाने हीच मागणी लावून धरत दिशा सालियन मृत्यूची चौकशी केलेल्या एसआयटीचा अहवाल खुला करण्याची मागणी केली. यावेळी झालेल्या गोंधळामुळे विधानसभेचे कामकाज एकदा तर विधान परिषदेचे कामकाज तीनवेळा तहकूब करावे लागले.

गुरूवारी विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर भाजपचे आमदार अमित साटम यांनी दिशा सालियनच्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला.दिशा सालियनचा मृत्यू जून २०२० मध्ये झाला. त्यानंतर सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डिसेंबर २०२२ मध्ये एसआयटी स्थापन केली.आता दिशाच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून दिशाच्या मृत्यूची पुन्हा चौकशी करण्याची मागणी केली आहे. याचिकेत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचा संशय तिच्या वडिलांनी व्यक्त केला आहे.त्यामुळे या प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करावी, शी मागणी आमदार साटम यांनी केली. या म ागणीचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी समर्थन केले.

त्यानंतर मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत ज्यांच्यावर बलात्काराचा आरोप आहे,अशांना अटक केली जाते. त्यामुळे आघाडी सरकारमधील माजी मंत्र्याला त्वरित अटक करून चौकशी करावी,अशी मागणी राणे यांनी केली.सामान्य माणसाला जो न्याय तोच न्याय माजी मंत्र्यांना लावण्यात यावा,असेही राणे म्हणाले.यावेळी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी मंत्री नितेश राणे यांच्या मागणीला पाठिंबा दिला. दिशा सालियन प्रकरणात ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांना अटक करून त्यांची चौकशी करावी,असे देसाई म्हणाले.

यावर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. सालियन मृत्यूची चौकशी करणाऱ्या एसआयटीचा अहवाल अद्याप सरकारला सादर झालेला नाही. चौकशी अजूनही सुरू आहे. ही चौकशी जलदगतीने पूर्ण केली.आता पीडितेच्या वडिलांनी न्यायालयात धाव घेतली आहे.राज्य सरकार देखील या प्रकरणात पक्षकार आहे. त्यामुळे सरकार आता न्यायालयाच्या निर्देशांनुसार पुढील कार्यवाही करेल. कायदा सर्वांसाठी समान आहे. त्यामुळे कोणालाही सोडले जाणार नाही,असे कदम यांनी यावेळी सांगितले. भाजपच्या आमदारांनी दिशा सालियनचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला तेव्हा शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सभागृहात उपस्थित नव्हते. ठाकरे गटाचे आमदार राजभवनवर राज्यपालांना भेटण्यासाठी गेले होते. त्यामुळे महाविकास आघाडीच्या वतीने आमदार रोहित पवार यांनी किल्ला लढवत आदित्य ठाकरे यांच्यावरील आरोप फेटाळून लावले. यावेळी विधानसभेत प्रचंड गोंधळ झाला. राहुल नार्वेकर यांनी गोंधळातच लक्षवेधी सूचना पुकारल्या. मात्र, सभागृहातील गदारोळ लक्षात घेऊन त्यांनी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

विधानपरिषदेत गोंधळ

दरम्यान, विधानपरिषदेत शिंदे गटाच्या मनीषा कायंदे यांनी शून्य प्रहरात दिशा सालियान प्रकरणाचा म ुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. त्याला ठाकरे गटाने आक्षेप घेतला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कामकाजावर आक्षेप घेत, अशा पद्धतीने ग्रामपंचायतीचेही कामकाज चालत नाही. कुणीही कोणत्याही पद्धतीने नियमात नसताना मुद्दा उपस्थित करतात हे बरोबर नाही, असे म्हणत सभापतींकडे नियमानुसार कामकाज करण्याची मागणी केली. अनिल परब यांनीही सभापतींच्या कामकाजावर आक्षेप घेतला. ते म्हणाले, सभापती हे सभागृहातील सर्वोच्च आहेत. हे न्यायपीठ आहे. सभापतींची खुर्ची ही गावच्या चौकातील नाही, ती न्यायपीठातील आहे. तुमच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येत नाही, या एका सबबीखाली तुम्ही कामकाज करून निर्णय घेत आहात. घटनेची मोडतोड होत आहे. कामकाजाची मोडतोड होत आहे.

शून्य प्रहरात दिशा सालियानचे प्रकरण कसे काय मांडू दिले?, मनीषा कायंदे यांनी ठाकरे गटात असताना सीबीआयने ठाकरे यांना क्लिन चीट दिली असल्याचे एक ट्विट केले होते. त्यात राणे पिता पुत्रांवर टीका केली होती. त्यामुळे आता त्या मुद्दा मांडत आहेत,असे सांगत अनिल परब त्यांच्यावर रंग बदलणाऱ्या एका प्राण्याची उपमा दिली.त्यावर सत्ताधाऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर ते शब्द कामकाजातून काढून टाकण्यात आले.

विधानभवनाच्या पायऱ्यांवर सत्ताधारी शिवसेना-भाजपचे आंदोलन

दिशा सालीन संशयास्पद मृत्यू प्रकरणी तिच्या वडिलांनी केलेल्या उच्च न्यायालयातील आरोपांवरून आदित्य ठाकरे यांना तत्काळ अटक करा दोषींवर कठोर कारवाई करा अशा मागणीसाठी सत्ताधारी शिवसेना तसेच भाजपाच्या आम दारांनी सकाळीच विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले.

# देशी गाई संगोपनातील महाराष्ट्र शासनाची वाटचाल

महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य आहे आणि येथे विविध प्रकारच्या देशी गाईच्या जाती आढळतात. यामध्ये मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील लाल कंधारी, लातूर जिल्ह्यातील देवणी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी, तर विदर्भात गवळाऊ जातींचा समावेश आहे. देशी गाईचे दूध हे मानवी आहारातील अत्यंत पोषणमूल्य असलेला पदार्थ आहे, ज्याचा उपयोग आयुर्वेदिक चिकित्सा पद्धती आणि सेंद्रिय शेतीत मोठ्या प्रमाणावर केला जातो.

देशी गाईच्या दुधाचे मानवी आहारात स्थान असतेच, परंतु त्याचबरोबर देशी गाईचे गोमूत्र व शेण यांचा सेंद्रिय शेतीसाठी महत्त्वपूर्ण उपयोग होतो. त्यामुळे, देशी गाईच्या संख्येत होणारी घट ही चिंतेची बाब बनली आहे. महाराष्ट्रात देखील यामध्ये घट होत असताना, महाराष्ट्र शासनाने देशी गाईचे संरक्षण आणि त्यांच्या संगोपनासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. चला, जाणून घेऊया महाराष्ट्र शासनाच्या विविध उपाययोजनांबद्दलः

संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायदा

महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र प्राणी रक्षण सुधारणा अधिनियम १९९५ आणला गेला. या कायद्यानुसार २०१५ पासून महाराष्ट्र राज्यात गोवंशांची (गाय, बैल, वळू, वासरे) हत्या पूर्णपणे बंदी केली आहे.

या कायद्याअंतर्गत राज्यात कुणालाही गोवंशांची कत्तल करणे, कत्तलीसाठी वाहतूक करणे, किंवा कत्तल केलेले मांस विक्रीसाठी आणणे किंवा ताब्यात ठेवणे हे कायद्याने निषिद्ध आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा किंवा १०,००० रुपये दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. या कायद्यामुळे देशी गाईच्या संरक्षणाला मोठा हातभार लागला आहे.



देशी गाईस राजमाता गोमाता घोषित करणे

भारतीय संस्कृतीत देशी गाईला नेहमीच विशेष महत्त्व दिले गेले आहे. आयुर्वेदात पंचगव्याचा वापर आणि सेंद्रिय शेतीत गोमूत्र व शेण यांचे महत्त्व लक्षात घेत, महाराष्ट्र शासनाने ३० सप्टेंबर २०२४ रोजी देशी गाईला राज्य माता 'गोमाता' म्हणून घोषित केले आहे. यामुळे देशी गाईच्या संगोपनास अधिक अधिकार आणि संरक्षण मिळाले आहे.

गोसेवा आयोगाची स्थापना

महाराष्ट्रात प्राणी संरक्षण व संवर्धनासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी आणि त्यांचे कार्यप्रदर्शन सुधारण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग २०२३ मध्ये स्थापित करण्यात आला. या माध्यमातून पशु संरक्षण, गोवंश संरक्षण, अनुवंशिक सुधारणा, आणि वैरण विकासासाठी काम केले जात आहे. आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. चंद्रशेखर मुंदडा आणि सदस्य सचिव म्हणून डॉ. मंजुषा जोशी कार्यरत आहेत. यामुळे गोवंशाच्या संवर्धनाला एक मजबूत आधार मिळाला.

सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्राची स्थापना

देशी गाईच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने सुधारित 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन केले आहेत. या केंद्रांत गोवंशांची देखभाल, गोमूत्र व शेणापासून विविध उत्पादने तयार करण्यासाठी विशेष सुविधा दिल्या जातात.

या केंद्रात गोवंशांच्या देखभालीसाठी गोशाळा व गोवंश असलेल्या संस्थांना अनुदान देण्यात येते, जेणेकरून त्यांना चारापाणी, निवाऱ्याची सोय केली जाऊ शकेल. प्रत्येक तालुक्यात एक 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

देशी गाईसाठी परिपोषण आहार

महाराष्ट्र शासनाने २०२४ पासून गोशाळांमध्ये संगोपन करणाऱ्या देशी गाईसाठी ५० रुपये प्रति गोवंश अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. यासाठी गोशाळांना पंरपरागत गोवंशाची देखभाल आणि संगोपन करणे, व त्यांना योग्य आहार देणे आवश्यक आहे. गोशाळेचे नोंदणी करणाऱ्या संस्थाचं या अनुदानासाठी पात्र आहे.

मनरेगामधून गोठा बांधणी

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत गोठा बांधणीसाठी अनुदान दिले जाते. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना त्यांच्या गोवंशाच्या संख्येनुसार ७७ हजार ते २ लाख ३१ हजार रुपयांपर्यंत गोठा बांधणीसाठी अनुदान मिळते. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पशुधनाची देखभाल करण्यासाठी आवश्यक गोठे बांधता येतात, आणि त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊ शकते.

चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान दिले जाते.

हे अनुदान विशेषत: वन जमिनीजवळील गायरानसाठी दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांना गोवंशांसाठी योग्य चारा लागवड करता येतो.

देशी गाईचे संवर्धन हे केवळ आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचे नाही, तर ते पर्यावरणीय दृष्ट्या देखील आवश्यक आहे.

देशी गाईच्या दुधाचे पोषणमूल्य, गोमूत्र व शेणाचे सेंद्रिय शेतीमध्ये योगदान, आणि शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून देणारे फायदे लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने उचललेले पाऊले अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे देशी गाईचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी सरकारच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ घेणे आवश्यक आहे.

आपण सर्वांनी एकत्र येऊन देशी गाईच्या संगोपनात सहभागी झाल्यास महाराष्ट्रातील गाईचे संरक्षण सुनिश्चित होईल, आणि शेतकऱ्यांना एक समृद्ध आणि सशक्त भविष्य मिळेल.

**- डॉ. राजकुमार पडिले,**
उपायुक्त, पशुसंवर्धन, नांदेड

# राज्यातील सरकारी शाळांना आता सीबीएसई पॅटर्न

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच एस.एस.सी बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात गुरूवारी सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे स्पष्ट केले.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत ही माहिती दिली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्दे श यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होत्या.

सीबीएसईची पाठ्यपुस्तके इंग्रजी व हिंदी माध्यमात उपलब्ध आहेत. मात्र, ती मराठीसह अन्य भाषेत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. शाळांचे वार्षिक वेळापत्रक १५ जूनपासून सुरू होते. पण, नवीन शैक्षणिक सीबीएसईच्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यासाठी विचार सुरू आहे, असेही भुसे यांनी उत्तरात स्पष्ट केले आहे.

राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असे दादा भुसे यांनी सांगितले.

# वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचा निर्णय घेतला आहे. सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (कडठझ) बसविण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत वाहन मालकांना मुदत देण्यात आली होती.

आजपर्यंत जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे काम कमी झाले असल्याने उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या जुन्या वाहनांना ही पाटी बसविण्याकरिता ३ संस्थाची /उत्पादकांची परिवहन विभागामार्फत निवड केली आहे.

तरी संबंधित वाहन मालकांनी याची नोंद घेऊन ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी असलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यात यावी, असे आवाहन परिवहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# छत्तीसगडमध्ये दोन चकमकीत ३० नक्षलवादी ठार

बीजापूर : छत्तीसगडमधील बीजापूर आणि कांकेर या दोन ठिकाणी झालेल्या चकमकीत ३० नक्षलवादी ठार झाले. बीजापूरमध्ये २६ आणि कांकेरमध्ये ४ नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकांनी गुरुवार २० मार्च २०२५ रोज सकाळी सात वाजल्यापासूनच नक्षलवाद्यांविरोधात कारवाई सुरू केली. या कारवाईद्वारे सुरक्षा पथकांनी नक्षलवाद्यांना मोठा दणका दिला.

एक चकमक बीजापूर - दंतेवाडा सीमेजवळच्या जंगलात बीजापूरमध्ये तर दुसरी चकमक कांकेरमध्ये झाली. दिवसभरात झालेल्या दोन चकमकींपैकी एका चकमकीत एक जवान हुतात्मा झाला. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या दोघांनी सुरक्षा पथकांचे त्यांच्या कामगिरीसाठी कौतुक केले आहे.

# जिओस्पॅशल तंत्रज्ञान : एक प्रभावी साधन



जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे अनेक विषयांवरील कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्याअंतर्गत ६ मार्च रोजी मुंबईत 'स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स' ही राष्ट्रीय परिषद पार पडली, त्यानिमित्तः

सुशासन आणि ग्रामविकास हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे घटक आहेत. आधुनिक युगात तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जिओस्पॅशल तंत्रज्ञानातून आपल्याला अवकाश, भू-स्थानिक आणि भौगोलिक स्थितीची परिपूर्ण माहिती व विश्लेषण उपलब्ध होते, ज्याचा प्रशासन आणि विकासकामांमध्ये उत्तम उपयोग होऊ शकतो.

सुशासन म्हणजे पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकहिताचे प्रशासन नियोजन, धोरणे ठरविणे आणि योजनांची प्रभावी, जलद व अचूक अंमलबजावणी करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. जीपीएस, रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस यांसारख्या प्रणालीच्या मदतीने गावांची अचूक माहिती मिळते, जी हे आव्हान पेलण्यात उपयुक्त ठरते. जुन्या पद्धतींवर अवलंबून राहिल्यामुळे अनेकदा अयोग्य योजना तयार होतात आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन चुकते. जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते.

गावाच्या नैसर्गिक संसाधनांचे अचूक विश्लेषण करण्यासाठी त्यांची माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती आज उपग्रहांद्वारे विविध माध्यमांवर उपलब्ध आहे. त्याआधारे निर्णय घेतल्यास योग्य योजना आखता येतात. जलसंधारण, मृदा संरक्षण, सामाजिक वनीकरण आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी या माहितीचा उपयोग होतो. ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी आणि स्थानिक प्रशासनाला वैज्ञानिक पद्धतींनी नियोजन करण्याची संधी मिळते. तसेच निधी वितरण, योजनांची अंमलबजावणी आणि विकासकामांचा मागोवा घेणे सुलभ होते.

गावाचा विकास हा पाणी, शेती आणि शासन यांवर अवलंबून असतो. अनेक गावांमध्ये पाणीप्रश्न गंभीर आहे. काही वेळा पुरेसा जलसाठा उपलब्ध असूनही व्यवस्थापनाच्या अभावामुळे पाणीटंचाई असते. पावसामुळे जे पाणी मिळते ते बऱ्याच वेळा वाहून जाते. इस्रोने विकसित केलेल्या अनेक संकेतस्थळांवर गावातील जलस्त्रोतांची माहिती उपलब्ध असते किंवा नसल्यास ती उपलब्ध करता येते. या माहितीच्या आधारे जलव्यवस्थापन आणि संवर्धन करता येते. उदाहरणार्थ, इस्त्रोच्या भुवन या संकेतस्थळावर मिळणाऱ्या माहितीआधारे जलस्त्रोत शोधणे व भू-जलस्तर निरीक्षण करता येते. ग्रामविकासासाठी जलव्यवस्थापनेनंतर शेती व्यवस्थापन येते. जमिनीचा प्रकार, मृदा आरोग्य विश्लेषण व पीक पद्धती ठरविण्यात या तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी पडतो. पर्यावरण संवर्धनासाठी गावातील मोकळ्या जमिनीवर हवामान आधारित वृक्षारोपण, वनसंवर्धन आणि वनधोरणात पारदर्शकता अशा गोष्टींचे योग्य नियोजन करता येते.

गावाच्या विकासासाठी गरजेच्या असणाऱ्या पायाभूत सुविधा आणि त्यांचे नियोजन करण्यासाठी ग्राम मानचित्र संकेतस्थळावरच्या माहितीचा वापर करता येतो. गुगल अर्थ प्रोद्वारे थेट उपग्रह प्रतिमा वापरून योजना तयार करता येतात. भू-नकाशे जमिनीच्या डिजिटल नोंदीसाठी उपयुक्त ठरतात. पीएम-किसान संकेतस्थळ शेतकऱ्यांसाठी अचूक आणि वेळेवर निधीवाटपासाठी उपयुक्त ठरते. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन करणे हे एक मोठे आव्हान असते. भुवन संकेतस्थळावरील माहिती वापरून आपत्तीपूर्व अंदाजही वर्तवता येतो आणि व्यवस्थापन करणे सोपे जाते. पूर, दुष्काळ आणि हवामान परिस्थितीचे निरीक्षण करता येते.

या माहितीस्रोतांचा उपयोग करण्यात आव्हाने तर आहेतच, जसे की तांत्रिक ज्ञानाचा अभाव, भू-सांख्यिकी माहिती व संसाधनांची कमतरता आणि स्थानिक भाषेत माहिती उपलब्ध नसणे; पण प्रशिक्षण शिबिरांतून मोफत व सार्वजनिक माहितीस्रोतांचा वापर आणि भ्रमणध्वनी आधारित जीआयएस ॲप्सचा वापर करायला शिकणे आणि स्थानिक भाषेत संकेतस्थळे विकसित करणे अशा उपाययोजना करून हे अडथळे दूर करता येतील. आपण लोकप्रतिनिधींना निवडून देऊन सरकार चालविण्यासाठी चालकाच्या आसनावर बसवितो; पण त्यांना व प्रशासनाला या कामाचे प्रशिक्षण देणेही गरजेचे असते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने हे ओळखून अनेक विषयांवरील कार्यशाळा आजपर्यंत आयोजित केल्या आहेत. महिला लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांच्या महिला सदस्यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'उपग्रह आपल्या हाती' हे भूस्थानिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण इस्रोसोबत आठ राज्यांमध्ये यशस्वीपणे दिले आहे. त्यामध्ये पाचशेहून अधिक प्रतिनिधींना प्रशिक्षित करण्यात आले. त्याचेच पुढचे पाऊल म्हणजे आज उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे संपन्न झालेली 'स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स' ही राष्ट्रीय परिषदः

**– गीता कुलकर्णी,**
प्रकल्प समन्वयक, महिला सक्षमीकरण विभाग, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, उत्तन, ठाणे

# तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

सरकारने तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी दिली. ज्यामध्ये लष्कराच्या रणगाड्यांसाठी अधिक शक्तिशाली इंजिन, नौदलासाठी पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आणि हवाई दलासाठी पाळत ठेवणारी प्रणाली एडब्ल्यूएसीएस खरेदीचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज, गुरुवारी झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत या संदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. परिषदेने बैठकीत ५४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या ८ भांडवली अधिग्रहण प्रस्तावांना आवश्यकता स्वीकृती दिली.

या करारांमध्ये लष्करासाठी असलेल्या टी-९० टँकच्या विद्यमान १००० एचपी इंजिनांना अपग्रेड करण्यासाठी १३५९ एचपी इंजिनांच्या खरेदीला मंजुरी समाविष्ट आहे. यामुळे या रणगाड्यांची युद्धभूमीतील गतिशीलता वाढेल, विशेषतः उंचावरील भागात, कारण त्यामुळे शक्ती-ते-वजन गुणोत्तर वाढेल. भारतीय नौदलासाठी, वरुणास्त्र टॉर्पेडो (लढाऊ) खरेदीलाही मान्यता देण्यात आली आहे.


वरुणास्त्र टॉर्पेडो हा नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेने विकसित केलेला स्वदेशी विकसित केलेला जहाजावरून सोडला जाणारा पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आहे.

नौदलात या टॉर्पेडोचा मोठ्या प्रमाणात समावेश झाल्यामुळे, शत्रूच्या पाणबुड्या नष्ट करण्याची त्यांची क्षमता वाढेल.

गरजेनुसार, भारतीय हवाई दलासाठी एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल (एडब्ल्यूएसीएस) प्रणाली खरेदी करण्यासही परिषदेने मान्यता दिली.

एडब्ल्यूएसीएस प्रणाली हवाई दलाच्या क्षमता वाढवेल आणि युद्धाच्या संपूर्ण क्षेत्राला बदलण्यास सक्षम आहे. संरक्षण मंत्रालयाने २०२५ हे वर्ष 'सुधारणांचे वर्ष' म्हणून पाळले असल्याने, परिषदेने भांडवल अधिग्रहण प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर वेळेची मर्यादा कमी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता दिली जेणेकरून ती जलद, अधिक प्रभावी आणि कार्यक्षम होईल.

# भारतीय नागरिकाने खरेदी केला ५० कोटींचा कुत्रा



बंगळुरू : कर्नाटकचे आयटी हब असलेल्या बंगळुरू शहरातील एका एस. सतिश यांनी तब्बल ४.४ पौंड मोजून अर्थात ५० कोटी रुपये मोजून वुल्फडॉग प्रजातीचा कुत्रा खरेदी केला.

एस. सतिश हे दुमिळ श्वानांच्या खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. एका ब्रोकरच्या माध्यमातून त्यांनी फेब्रुवारी महिन्यात या श्वानाची खरेदी केली होती. कॅडाबॉम्ब ओकामी असे या वुल्फडॉगचे नाव आहे. हा जगातील एक वुल्फडॉग प्रजातीचा एकमेव दुमिळ श्वान आहे. तो वुल्फ आणि कॉकेशियन शेफर्ड यांच्या संकरातून जन्माला आला आहे. त्यामुळेच तो जगातला सर्वाधिक महागडा वुल्फडॉग ठरला आहे. त्याचे वय सध्या आठ महिने असून वजन ७५ किलो इतके आहे. तर त्याची उंची ३० इंच इतकी आहे. कॉकेशियन शेफर्ड ही प्रजात त्यांच्या अतुल्य ताकदीसाठी ओळखली जाते.

सहसा ही प्रजात जॉर्जिया आणि रशिया अशा थंड प्रदेशात आढळते. लांडगे व इतर वन्य प्राण्यांपासून संरक्षणासाठी प्रामुख्याने या श्वानांचा उपयोग केला जातो.

एस. सतीश हे इंडियन डॉग ब्रीडर्स असोसिएशनचे प्रमुख आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी श्वान प्रजनन व्यवसाय सोडला असला तरी आता ते आपल्या दुमिळ कुत्र्यांचे प्रदर्शन करून उदरनिर्वाह करतात. त्यात अर्धा तासासाठी दोन लाख ४६ हजार ७०५ रूपयांपासून ते ५ तासांच्या इव्हेंटसाठी १० लाख ९ हजार २५१ रुपये इतकी कमाई ते करतात.

सतीश यांनी शेतामध्ये ७ एकरात फार्म हाऊस तयार केले आहे. येथे प्रत्येक कुत्र्यासाठी २० बाय २० फूट आकाराची स्वतंत्र रूम आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी येथे १० फूट उंच भिंती असून हा परिसर २४ बाय ७ सीसीटीव्ही देखरेखीखाली आहे.

# 'माविम सुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५' चे उद्घाटन असक्षम महिला भगिनींना राजकीय, सामजिक आणि आर्थिक बळ देऊ

**ठाणे :** पतीच्या खांद्याला खांदा लावून आपल्या संसाराचा गाडा ओढत असताना असक्षम महिला भगिनींना, राजकीय, सामजिक आणि आर्थिक बळ देवून त्यांना खऱ्या अर्थाने समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी आज येथे केले.

महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविम) यशस्वी ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल माविम सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून आज नवी मुंबईतील वाशी सिडको प्रदर्शन केंद्र येथे झालेल्या ङ्गमाविम सुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ङ्घ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

दि. २० ते २५ मार्च २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, गृहउपयोगी साधन सामग्री असलेल्या जिल्हास्तरीय माविम ङ्गसुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ङ्घ प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झाले. सुरुवातीस मंत्री नाईक यांनी प्रदर्शनाची पाहणी केली व स्टॉलला भेटी देवून स्टॉलमध्ये विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या वस्तू व पदार्थांची माहिती घेतली.

या सोहळ्याप्रसंगी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रशांत ठाकूर, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, महिला व बालविकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा-उंटवाल, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, इफाड च्या राष्ट्रीय समन्वयक मीरा मिश्रा, शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी तसेच महाराष्ट्राच्या विविध ठिकाणांहून आलेल्या बचतगटांच्या महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीप प्रज्वलनाने या उद्घाटन सोहळ्याचा शुभारंभ झाला.

वनमंत्री गणेश नाईक हे उपस्थित सर्व महिलांना माविमच्या सुवर्णमोहोत्सवी दिनाच्या शुभेच्छा देत म्हणाले की, आदिती तटकरे आणि मेघना साकोरे-बोर्डीकर या दोन महिला मंत्र्यांच्या नेतृत्वाने माविम च्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी वर्षाला उत्तम गती मिळेल.

मंत्री नाईक पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी महिलांना सक्षम करण्याची फक्त इच्छाच व्यक्त केली नाही, तर त्याअनुषंगाने दमदार पावलेदेखील उचलली आहेत. महिलांना पाण्यासाठी वणवण फिरायला लागू नये, यासाठी जलजीवन मिशन युद्धपातळीवर राबविण्यात आले. अन्न, वस्त्र, निवारा आणि महिलांचा सन्मान यानुषंगाने पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांची भूमिका सकारात्मक आहे.

महाराष्ट्र राज्यात जेव्हा महिलांच्या विकासासाठी काही अपेक्षा केली तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह सर्व मंत्रिमंडळाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. जोपर्यंत महिला सक्षम होत नाही तोपर्यंत कुटुंब सक्षम होत नाही, असे म्हणत येणाऱ्या कालखंडात महिला अधिक सक्षम होतील, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माविमचा सुवर्ण महोत्सव आपण आज साजरा करू शकलो कारण माविमच्या प्रत्येक घटकाने माविमच्या यशासाठी मोलाचा वाटा उचलला आहे. खऱ्या अर्थाने सगळ्यांचे कष्ट आणि माविमला प्रतिसाद देणारी प्रत्येक महिला ही आजच्या या सोहळ्याची तितकीच समान मानकरी आहे, जितकी या विभागाची प्रतिनिधी म्हणून मी आहे. माविमला यशस्वी करण्यासाठी खूप कठीण प्रसंगांचा सामना करावा लागला आणि आज माविम मधे २० लाखांहून अधिक महिला साहभागी झाल्या आहेत.

ाविमला केवळ राज्य अनब राष्ट्रीय स्तरावरच नाही तर थेट आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मानित करण्यात आले आहे. सगळ्या बचतगटांच्या चळवळीत माविमच आयडियल मॉडेल आहे. कारण माविम कोणावरही अवलंबून न राहता महिलांना कर्ज देते. माविमच्या महिला बचतगटांचा कर्ज परतफेडीचा दर ९९.०५ टक्के आहे. याचा मला अभिमान आहे, असे सांगून आदिती तटकरे यांनी माविमच्या महिलांचे अभिनंदन केले.

त्या पुढे म्हणाल्या की, आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव ठेवला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांवर प्रत्येक ३५ ते ५० किलोमीटरच्या अंतरावर महिलांसाठी स्वच्छ सुंदर शौचालये बांधण्यात यावे आणि त्या शौचालयाच्या जवळपास स्टॉल उपलब्ध करून दिल्यास माविमच्या माध्यमातून त्या स्टॉलवर होणाऱ्या उत्पादनांच्या विक्रीतून शौचालयांच्या देखभालीचा खर्च भागविला जावू शकतो. तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून उमेद प्रमाणे तालुक्याच्या प्रत्येक नगरपंचायतीच्या बाजारपेठेच्या ठिकाणी माविमचे स्वतंत्र अस्मिता भवन उभारण्यात येईल. असा प्रस्तावच शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

या अस्मिता भवनात माविमच्या महिलांची उत्पादने, विक्रीसाठी स्टॉल, माविमची कार्यालये, प्रशिक्षण केंद्र असणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी माविमच्या विस्ताराची मागणी मान्य केली असून, माविममधील महिलांची संख्या २० लाखांहून किमान ५० लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट आम्ही या सुवर्ण महोत्सवी दिवशी ठरविले आहे.

राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी नुकत्याच अंतराळात ९ महिने राहून पृथ्वीवर परतलेल्या सुनिता विल्यम्स यांचा दाखला देत स्त्रीशक्तीच्या इच्छाशक्ती आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले.

माविमच्य महिलांचे कष्ट आणि त्यांच्या यशकथा पाहून मला अभिमान वाटतो, असेही त्या म्हणाल्या. यावेळी माविम च्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या रमा कांबळे, स्वाती विठ्ठल शेळके, वैशाली वसंत पाटील, रोहिणी भानुदास कुसमागडे, शशिकला नारायण डांगे, मंजुताई राजेंद्र ठाकरे, संगिता कोळी या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी माविमच्य महिला बचतगटांच्या यशकथा तसेच त्यांची उत्पादने याची माहिती असणाऱ्या एकूण ३ कॅटलॉगचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकपर भाषणात महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी माविमबद्दल सविस्तर माहिती दिली.

महिलांना गुंतवणुकदारांसाठी रेड कार्पेट, उद्योजकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणार

**– विजयलक्ष्मी बिदरी**

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

**• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

**•Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** •Email : **attalsanket2023@gmail.com** •RNI No. MAHMAR/2023/87816